ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT

वर्ष २० पुणें, बुधवार तारीख १५ डिसेंबर, १९५४ अंक ४५

## विविध माहिती

**पाकिस्तानांत पोलादाचा कारखाना**—जर्मनीमधील सुप्रसिद्ध क्रुप्स कंपनीचे दोघे प्रतिनिधी सध्यां पाकिस्तानांत दौऱ्यावर आहेत. पाकिस्तानांत एंजिनिअरिंगचे कांहीं कारखाने काढण्याचा प्रयत्नांत ते आहेत, असें समजतें. ह्या कारखान्यांपैकीं एक पोलादाचा असून तो पाकिस्तान इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनतर्फे काढण्यांत येणार आहे. कारखान्यांत सुरवातीला दरवर्षी ५०,००० टन पोलाद निर्माण होईल. उत्पादनक्षमता हळूहळू ३,००,००० टनापर्यंत वाढविण्यांत येईल.

**उसाच्या लागवडींत घट**—मध्य भारतांत गेल्या पांच वर्षांत उंसाखालील लागवडीची जमीन बरीच कमी झाली असल्याचें समजतें. १९४९ सालीं ७७,००० एकर जमिनींत उसाची लागवड करण्यांत आली होती. आतां अवघ्या ३१,००० एकरांत उसाचें पीक काढण्यांत येत आहे. मध्य भारताला दरवर्षी ८ लाख मण साखर लागते. गेल्या वर्षी राज्यांतील साखर-कारखान्यांनीं ३,१९,००० मण साखर तयार केली.

**रेल्वेचा नवीन रस्ता**—हैद्राबाद राज्यांतील भीर जिल्ह्यांत असलेल्या पारले ह्या गांवापासून अहमदनगरपर्यंत नवा रेल्वेरस्ता बांधण्याचा भारतीय सरकारचा विचार आहे, असें समजतें. भीर जिल्ह्यांतील व्यापाराची वृद्धि व्हावी आणि दळणवळण सुलभ व्हावें, म्हणून ह्या मार्गाची सूचना राज्यसरकारतर्फे करण्यांत आली होती.

**टोकिओंत खेळांसाठी आखाडा**—मैदानी खेळांच्या स्पर्धा भरविण्यास उपयुक्त असा एक मोठा आखाडा जपानमध्यें बांधण्यांत येणार असल्याचें समजतें. ह्या आखाड्यासाठी १४ लाख पौंड खर्च येईल. तो बहुधा टोकिओ शहरांत बांधण्यांत येईल आणि १९६० सालांतील ऑलिंपिक खेळाचे सामने तेथेंच भरविण्यांत येण्याचा संभव आहे. टोकिओंत सध्या असलेल्या आखाड्यांत १०,००० प्रेक्षकांची बसण्याची सोय आहे. नव्या आखाड्यांत ५०,००० प्रेक्षक बसूं शकतील.

**बंगलोर येथें आर्ट गॅलरी**—बंगलोर येथें लवकरच एका आर्ट गॅलरीची स्थापना करण्यांत येणार असल्याचें समजतें. कबन बाग ह्या नांवानें प्रसिद्ध असलेल्या पार्कमधील व्हिक्टोरिआ हॉल ह्या इमारतींत आर्ट गॅलरी उघडण्यांत येईल. त्यासाठी इमारतींत कांहीं फेरबदल करण्यांत येणार आहे.

**जपानी तज्ज्ञाचें साह्य**—आसाम राज्यांत कोणत्या प्रकारचे ग्रामोद्योग सुरू करतां येतील, हें पहाण्यासाठी त्या दृष्टीनें सर्व राज्याची पहाणी करण्याचें कार्य एका जपानी तज्ज्ञाकडे सोंपविण्याचें राज्य सरकारनें ठरविलें आहे. चालू ग्रामोद्योगांत सुधारणा सुचविण्याचें कार्यहि त्यानें करावयाचें आहे.

**ब्रिटन व चीनचा व्यापार**—ब्रिटिश कारखानदार आणि उद्योगपती ह्यांनीं चीनशीं बरेच व्यापारी सौदे केले असल्याचें समजतें. चीनचा परराष्ट्रीय व्यापार चायना नॅशनल इंपोर्ट अँड एक्सपोर्ट ह्या संस्थेमार्फत चालतो. ही संस्था आणि ब्रिटिश कारखानदारांचे प्रतिनिधी ह्यांच्यांतील वाटाघाटींचें हें फळ आहे. पुढील मार्च महिन्यांत आणखी कांहीं ब्रिटिश कारखानदार पेकिंगला जाणार आहेत.

**चीनकडून कच्च्या रेशमाची आयात**—चीन आणि भारत ह्यांच्यांत झालेल्या व्यापारी करारास अनुसरून भारतानें चीनकडून ९० मेट्रिक टन कच्चें रेशीम घेण्याचें ठरविलें आहे. ही रेशमाची आयात सेंट्रल बोर्ड, मुंबई ह्या संस्थेमार्फत होणार आहे, अशी अधिकृत घोषणा करण्यांत आली आहे.

**विड्याच्या पानांची निर्बंधित आयात**—पूर्व पाकिस्तानांतून प. पाकिस्तानांत भारतीय हद्दींतून रेल्वे मार्गातून जाणाऱ्या विड्याच्या पानांच्या करंड्यावर पाकिस्तान-सरकारनें कांहीं निर्बंध घालण्याचें ठरविलें आहे. दररोज ८०० करंड्यांच्यापेक्षा अधिक करंड्या ह्या मार्गानें आयात करतां येणार नाहींत असे जाहीर करण्यांत आलें आहे. प्रत्येक करंडीचें वजन सुमारें २५ पौंड असेल.

**आलिव्हेटी टाइप-रायटर्सचा कारखाना**—युरोपमध्यें इटलीमधील ऑलिव्हेटी ही कंपनी टाइप-रायटर्स तयार करण्याबद्दल प्रसिद्ध आहे. ह्या कंपनीचे तज्ज्ञ सध्यां भारतांत आले असून कंपनीच्या टाइप-रायटर्सचा कारखाना काढण्याविषयीं मध्यवर्ती सरकारच्या व्यापार व उद्योग-खात्यांशीं त्यांची बोलणीं झालीं असें समजतें. जरूर ती माहितीहि त्यांनीं गोळा केली आहे.

**अमेरिकेंतील विजेचें उत्पादन**—अमेरिकेंतील कॅलिफोर्निआ, मिचिगन आणि ओहिओ ह्या उपराज्यांतून वीज-उत्पादनाचीं नवीं केंद्रें उभारण्यांत आलीं आहेत. नव्या वीज-केंद्रांचें उत्पादन जमेस धरून अमेरिकेचें विजेचें उत्पादन ११·६ कोटी किलोवॅट होईल. जगांत निर्माण होणाऱ्या विजेपैकीं ४१·७ टक्के उत्पादन एकट्या अमेरिकेंत होतें असा हिशेब बसतो.

**भारतीय अनुबोधकपट**—सध्यां भारतीय सरकारचें माहिती खातें इंग्लिश, हिंदी, तामीळ व तेलगू अशा पांच भाषांतून अनुबोधपट काढीत असतें. दरवर्षी सुमारें ३० ते ४० अनुबोधपट आणि ५२ वृत्तपट निरनिराळ्या विषयांसंबंधीं काढण्यांत येतात. व ते भारतामधील सर्व चित्रगृहांतून दाखविण्यांत येतात. माहितीपट अधिक भाषांतून काढण्याचा सरकार विचार करीत आहे असें समजतें.

### राजस्थानची खनिज संपत्ति

भारतामधील उपराज्यांत राजस्थान हें क्षेत्रफळानें दुसऱ्या क्रमांकाचें राज्य असून औद्योगिक दृष्ट्या अतिशय कमी विकास झालेलें असें आहे. ह्या राज्यांतील लोकांनीं आपल्या राज्याबाहेर बरेंच भांडवल गुंतविलेलें आहे हें प्रसिद्धच आहे. राज्याच्या खनिज संपत्तिसंबंधीं माहिती देणारी एक पुस्तिका सरकारतर्फे प्रसिद्ध करण्यांत आली आहे; राज्यांतील कोणत्या खाणी आर्थिक दृष्ट्या फायदेशीर चालविता येतील ह्याविषयीं पुस्तिकेंत मार्गदर्शन करण्यांत आलेलें आहे. राजस्थानांत सोन्याच्या अगर इतर मूल्यवान् खनिजांच्या खाणी नाहींत; तथापि इतर कांहीं खनिजांच्या खाणी मात्र आहेत. राजस्थानांत चुनखडीचा दगड आणि संगमरवरी दगड ह्या दोन्ही प्रकारचे इमारतीचे दगड विपुलतेनें सांपडतात. ताजमहाल, दिल्ली येथील लाल किल्ला आणि जुम्मा मशीद ह्यांसारख्या इतिहासप्रसिद्ध इमारतींच्या बांधकामांत दोन्ही प्रकारचे दगड वापरण्यांत आले आहेत. मुंबई, कलकत्तासारख्या ठिकाणीं कोट्यवधि रुपये खर्चून बांधण्यांत आलेल्या कांहीं इमारतींत संगमरवरी दगड दर्शनी भागासाठी वापरण्यांत आलेला आहे. पण तो इटलीमधून आणलेला आहे अशी माहिती मिळते. भारतांतील संगमरवरी दगड न वापरतां परदेशी कां वापरण्यांत आला अशी पृच्छा करण्यांत आली, तर स्थापत्यशास्त्रज्ञ असें उत्तर देतात कीं इटलीमधील दगड त्यामधील विविध रंगांच्या छटांमुळें अधिक चांगल्या दर्जाचा आहे. पण ताजमहालासारख्या सुंदर इमारतीला जर भारतामधील संगमरवरी दगड चालतो, तर एखाद्या बँकेच्या अगर विमा-कंपनीच्या भव्य इमारतीला तो कां चालू नये? असा प्रश्न विचारता येण्यासारखा आहे. राजस्थानमधील जिप्समच्या खाणींतून रोज २,००० टन जिप्सम सिंद्री येथील खताच्या कारखान्याला पुरविण्यात येतें.

---

### प्लॅस्टिकच्या धंद्याची प्रगति

ब्रिटनच्या इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीजच्या प्लॅस्टिकच्या विभागाचे अध्यक्ष मि. जे. सी. स्वॅलो हे नुकतेच कलकत्त्यास येऊन गेले. तेथें असतांना त्यांनीं भारताच्या प्लॅस्टिकच्या धंद्याचें निरीक्षण करून त्याच्या प्रगतिविषयीं प्रशंसोद्गार काढले. ते म्हणाले कीं, भारतामधील प्लॅस्टिकच्या धंद्याची वाढ ब्रिटन व अमेरिकेंतील ह्या धंद्याप्रमाणेंच झाली आहे. प्रथम ह्या धंद्यानें हौशीच्या वस्तू तयार करण्यावरच भर दिलेला दिसून येतो. हा धंदा आतां नव्या दिशेच्या प्रगतीच्या उंबरठ्यावर आहे. युरोपमध्यें उद्योगधंद्यांना उपयुक्त अशा प्लॅस्टिकच्या वस्तु तयार करण्यांत येत असतात. आतां भारतांतहि हळूहळू प्लॅस्टिकचा अशा प्रकारचा वापर करण्यांत येऊं लागलेला दिसून येत आहे. प्लॅस्टिकच्या धंद्याचा आढावा घेऊन मि. स्वॅलो ह्यांनीं ह्या धंद्याच्या भावी विस्ताराला आणखी बराच वाव आहे असें सांगितलें. ऑल इंडिआ प्लॅस्टिक मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सी. एल्. गुप्ता ह्यांनीं मि. स्वॅलो ह्यांचें स्वागत करून भारतीय कंपन्या आणि आय. सी. आय. ह्यांच्या संबंधांचें विवरण केलें. ते म्हणाले कीं, प्लॅस्टिकच्या धंद्याला लागणारा अनेक प्रकारचा कच्चा माल निर्माण करण्यांत आय. सी. आय. अग्रेसर आहे. 'परप्लेक्स' 'निलॉन' इत्यादी प्रमुख प्रकारचा कच्चा माल निर्माण करण्यांत ही कंपनी अत्यंत पुढारलेली आहे. अर्थातच भारतीय कंपन्यांना लागणारा कच्चा माल पुरविण्यांत तिचा फार मोठा भाग आहे. त्याचप्रमाणें आय. सी. आय. कंपनीच्या प्रयोगशाळेचीहि भारतीय कंपन्यांना चांगलीच मदत झालेली आहे. त्याशिवाय तज्ज्ञांचा सल्लाहि वेळोवेळीं मिळत गेला आहे.


# कण आणि क्षण

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

पृष्ठसंख्या १६८ } दुसरी आवृत्ति { किं. २॥ रु. ट. ख. ४ आ.

लेखक : श्रीपाद वामन काळे, संपादक, "अर्थ"

"मार्मिक निरीक्षण व नाजूक विनोद" —र. पु. परांजपे

"नव्या पिढीचें उद्बोधक गाईड" —वि. द. घाटे

"मनरंजनाबरोबर विचारांत महत्त्वाची भर" —शं. वा. किर्लोस्कर

"प्रापंचिकाचें चित्ताकर्षक मार्गदर्शन" चिं. वि. जोशी

"खुबीनें रंगविलेलें कौटुंबिक चित्र" —इरावती कर्वे

"कर्मयोगाचे सुबोध धडे" —ना. सी. फडके

"सुबोध, व्यावहारिक व पटणारें विवेचन" —इंदिराबाई देवधर

# सांगली बँक लि.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

मुंबई शाखा — फोर्ट

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | ४½ लाख |
| रिझर्व व फंडस् | ५¼ लाख |
| ठेवी व इतर | १ कोटी |

— व्याजाचे दर —

| | द. सा. द. शे. |
|---|---|
| करंट ... ... | रु. ½ |
| सेव्हिंग ... ... | रु. १½ |
| स्पे. सेव्हिंग ... | रु. २ |
| १ वर्ष मुदत ... | रु. ३ |
| ३ वर्ष मुदत ... | रु. ४ |

कॉल डिपॉझिट स्वीकारतो.
बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. १५ डिसेंबर, १९५४





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## श्री. भा. वि. घारपुरे ह्यांचें निधन

### महाराष्ट्र एका निष्ठावंत कार्यकर्त्यास मुकला !

लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयाचे क्युरेक्टर, श्री. भा. वि. घारपुरे, एफ. आर. ए. एस. हे दि. ६ डिसेंबर रोजीं मृत्यु पावले, हें नमूद करतांना आम्हांस अत्यंत दुःख होतें. लॉर्ड रे इंडस्ट्रिअल म्यूझिअमचें त्यांनीं पुनरुज्जीवन केलें, त्यास कायम स्वरूप देऊन त्याची प्रतिष्ठा वाढविली आणि त्याची उपयुक्तता सर्वांच्या नजरेस आणून देऊन म्युझियमला शैक्षणिक क्षेत्रांत महत्त्वाचें स्थान प्राप्त करून दिलें. कै. न्यायमूर्ति रानडे ह्यांनीं म्यूझिअम स्थापन केला, त्यांत त्यांची दूरदृष्टि आणि औद्योगिक प्रगतीची तळमळ दिसून आली. रावसाहेब घारपुरे ह्यांनीं न्यायमूर्तींचें कार्य निष्ठेनें व कार्यक्षमतेनें पुरें केलें. म्यूझियमसाठीं जगांतील ठिकठिकाणांहून ग्रंथ, यंत्रसामुग्री, मानचित्रें, इत्यादि त्यांनीं मिळविलीं आणि तीं महाराष्ट्रासमोर मांडलीं. म्यूझियममध्यें लोक येत नसतील तर लोकांच्याकडे म्यूझियम नेला पाहिजे, ह्या धोरणानें त्यांनीं ज्ञान कित्येकांच्या डोक्यांत भरविलें असेल. म्यूझियमच्या कार्याबद्दल त्यांची एकाग्रता ज्यांनीं प्रत्यक्ष अवलोकन केली असेल. त्यांनाच कळूं शकेल. अशा तऱ्हेचा एक थोर, निश्चयी, दूर दृष्टीचा, प्रसिद्धिपराङ्मुख कार्यकर्ता आपल्यांतून नाहींसा झाला आहे, त्याची उणीव भरून निघणें केवळ अशक्य आहे. म्यूझियमनें श्री. घारपुऱ्यांना जी संधि दिली, तिचा त्यांनीं सदुपयोग करून, स्वतःच्या लौकिकाचा फायदा संस्थेस मिळवून दिला; आणि लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयाचे घारपुरे असें म्हणण्यापेक्षा घारपुऱ्यांचा संग्रहालय,असें म्हणण्यालायक त्यांनीं त्याचें संवर्धन केलें.न्यायमूर्ति रानड्यांच्या आत्म्याला श्री. घारपुरे ह्यांच्या कामगिरीनें निश्चित संतोष झाला असेल. श्री. घारपुरे ह्यांच्या मागाहून येणारे चालक त्यांचें अनुकरण करतील अशी आशा आहे.

### श्री. घारपुरे यांच्या कार्यांचा परिचय

डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या फर्ग्युसन कॉलेजमध्यें त्यांचें शिक्षण झालें, त्यानंतर पुणें येथील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्यें यंत्र-स्थापत्याचें शिक्षण घेतलें. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची "वाङ्मयविशारद" पदवी त्यांनीं मिळविली. कांहीं काळ न्यू इंग्लिश स्कूलमध्यें "हस्तव्यवसाय" कामाचे शिक्षक म्हणून काम केलें. तेथें असतांना डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या सर्व माध्यमिक संस्थांतून हस्तव्यवसायाचें शिक्षण द्यावें व तें कसें द्यावें यासंबंधींची योजना प्रो. व्ही. बी. नाईक यांचे सांगण्यावरून त्यांनीं तयार करून दिली. यानंतर टिळक महाविद्यालयांत प्राध्यापक म्हणून कांहीं वर्षें त्यांनीं काम केलें. तेथें असतांना स्थापत्य शास्त्रासाठीं वर्कशॉप् चालूं केलें व त्यांत लहान लहान वस्तु विद्यार्थ्यांचेकडून तयार करवून घेऊन त्यांच्या विक्रीची व्यवस्था करण्यांत आली. टिळक महाविद्यालयांत असतांनाच गणेशोत्सवांत दहा दिवसांचीं प्रदर्शनें भरविण्याचा उपक्रम सुरू केला व हीं प्रदर्शनें त्यांच्या पुढील मोठ्या कार्याची व मोठेपणाची मुहूर्तमेढ ठरलीं. प्रदर्शनें भरविण्याचा उद्देश विद्यार्थ्यांनीं तयार केलेल्या वस्तु-विक्रीची सोय व विक्रय-कला व प्रदर्शनासारख्या संस्थांचीं कामें चालविण्याची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी, हा प्राधान्येंकरून होता. व्यापार-शास्त्रांतील विद्यार्थ्यांस प्रदर्शनाचे हिशेब इत्यादि माहितीचें प्रात्यक्षिक यांतून मिळत असे. हीं प्रदर्शनें दर वर्षीं गणेशोत्सवांत भरत असत व अशीं दहा प्रदर्शनें भरविलीं व तीं वर्षानुवर्षें लोकप्रिय होत गेलीं. वर्कशॉप् चालूं असतांना त्याचेसाठीं कॅटलॉग् इ. बरेच व बहुमोल वाङ्मय तेव्हां त्यांनीं जमा केलें होतें. हल्लीं हातानें काम करणें यांत कमीपणा नाहीं ही जागृति जनतेंत झाली आहे, परंतु त्या काळीं हातानें काम करणें कमीपणाचें आहे अशी जनतेंत भावना होती. अशा दिवसांत त्यांनीं हस्तव्यवसायाच्या शिक्षणाचे वर्ग चालविले होते. यावरून त्यांची दूरदृष्टि व चिकाटी हे गुण दृष्टोत्पत्तीस येतात.

१९३० सालीं विश्रामबागवाड्यांतील सरकारची कोर्टाची कचेरी शिवाजीनगरमधील नव्या इमारतींत गेली व वाडा सरकारनें विक्रीसाठीं काढला, तो पुणें नगरपालिकेनें स्वतःच्या कचेरीसाठीं खरेदी केला. याच सुमारास मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलांत सोलापूरचे आमदार लिगाडे प्रभृतींनीं रे म्यूझियम फंडासंबंधीं प्रश्न विचारून या रे म्यूझियमच्या प्रश्नास चालना दिली. यानंतर या रे म्यूझियम ट्रस्टसाठीं सार्वजनिक स्वरूपाची चळवळ करावी लागली व त्यांतूनच रे म्यूझियम या संस्थेचें पुनरुज्जीवन झालें. संस्थेची स्थापना न्यायमूर्ति रानडे व श्री. नामजोशी यांनीं १८८८ सालीं केली व या संस्थेचा जन्म पुणें येथें हिराबागेंत भरलेल्या प्रदर्शनांतूनच झाला. १९३० सालीं संग्रहालय पुनरुज्जीवित झाल्यापासून त्यास फक्त नगरपालिकेची सालीना देणगी मिळत असे व पुढें १९३७ सालीं कॉंग्रेस अधिकारारूढ झाल्यानंतर मुंबई प्रांतिक सरकारनें वार्षिक देणगी देण्यास सुरुवात केली. सध्यां संस्था नगरपालिकेच्या व सरकारी देणगीवर चालते. मुंबइ सरकारची संस्थेवर कृपादृष्टि आहे. आज संग्रहालयाचें जें शिक्षणाच्या दृष्टीनें अत्यंत उपयुक्त असें कार्य आपणांस दिसत आहे त्याचें बव्हंशीं सर्व श्रेय कै. घारपुरे यांचेकडे आहे. संग्रहालयाची त्यांनीं सर्वांगीण अशी वाढ केली असून त्याच्या उपयुक्ततेंत अत्यंत महत्त्वाची अशी भर घातली आहे. संग्रहालय सुरू झाल्यापासून परदेशांतील संग्रहालयें पाहून येण्याची महत्त्वाकांक्षा त्यांनीं आपल्या मनांत बाळगिली होती व ती त्यांच्या स्वतःच्याच परिश्रमानें व मुंबई प्रांतिक सरकारच्या कृपेनें व त्यांच्यावर व त्यांच्या संस्थेवर लोभ करणाऱ्या धनिकांच्या आर्थिक साहाय्यानें पूर्ण झाली. परदेशच्या प्रवासांत त्यांनीं संग्रहालयें, प्रयोगशाळा व कारखाने यांस मुख्यतः भेटी देऊन त्यांचा अभ्यास केला व पुष्कळ माहिती मिळविली. ज्ञानार्जनाची त्यांची तळमळ फार होती. याचें उदाहरण म्हणून असें सांगतां येईल कीं परदेशीं जाण्यापूर्वीं त्यांनीं टिळक महाराष्ट्र विद्यापीठास 'वाङ्मय-पारंगत' या पदवीसाठीं "औद्योगिक व आर्थिक संग्रहालयें, त्यांची संस्थापना व संवर्धन" या विषयावर इंग्रजींत

एक प्रबंध (निबंध) लिहून सादर केला. विद्यापीठानें तो निबंध संमत करून त्यांना "पारंगत" ही पदवी दिली. हा निबंध त्यांनी परदेशीं बरोबर नेला होता व अमेरिकेंतील व इंग्लंडमधील "म्यूझियम्स असोसिएशन"च्या सभासदांस तो दाखविला. त्यांत संग्रहालयविषयक त्यांच्या कल्पना त्यांनीं मांडल्या आहेत त्यांची तेथील संग्रहालयतज्ज्ञांनीं स्तुति करून त्यासंबंधींचे आपले उत्तम अभिप्राय पत्ररूपानें इकडे कळविलें आहेत. परदेशांत ज्या गोष्टी त्यांनीं पाहिल्या, त्यांपैकीं पुष्कळ अगोदरच येथें त्यांनीं चालू केल्या होत्या. उदाहरणार्थ, संग्रहालय ही शाळाच आहे, संग्रहालय व शिक्षणसंस्था यांचा निकट संबंध असणें अत्यावश्यक आहे व यायोगे विद्यार्थ्यांचा अतिशय फायदा आहे यासाठीं विद्यार्थ्यांस संग्रहालयांत आणून संग्रहालयांतील विषय त्यांस शिकविणें, या उपक्रमास पुणें येथील संग्रहालयानें कित्येक वर्षांपूर्वी सुरुवात केली होती. या उपक्रमास अधिक चालना देऊन, यासाठीं नवीन माणसें नेमून संग्रहालयाची अत्यंत महत्त्वाची बाजू त्यांनीं अलीकडे बरीच वाढविली होती. हल्लीं संग्रहालयांत दररोज ३४ वर्ग येऊन त्यांतील औद्योगिक विषय शिकून जातात. पुण्यांत अशी एकहि शाळा नसेल कीं ज्यांतील विद्यार्थ्यांनीं संग्रहालयापासून त्यांतील विषय शिकले नाहींत. आतां असें झालें आहे कीं, प्रत्येक शाळेंतील प्रत्येक वर्गानें वर्षांतून एकदोन वेळां संग्रहालयास भेट देऊन तेथील नवीन विषय शिकल्याशिवाय शिक्षणाची पूर्तता झाली असें शाळाचालकांस वाटत नाहीं. ही त्यांनीं केलेली अत्यंत महत्त्वाची कामगिरी आहे यांत शंका नाहीं.

अमेरिकेंतील "कॅर्नेजी" कॉर्पोरेशनच्या आर्थिक मदतीनें इंग्लंडमधील म्यूझियमच्या असोसिएशनच्या प्रतिनिधीनें हिंदुस्थानांतील सर्व संग्रहालयांची १९३७ सालीं पाहणी केली व या तज्ज्ञांनीं आपल्या अहवालांत पुणें येथील संग्रहालयाचें काम अत्युत्कृष्ट असल्याचें व तें योग्य मार्गानें चाललें असल्याबद्दल आपला अभिप्राय प्रगट केला आहे. पुणें येथील संग्रहालयानें नवीन नवीन योजना हातीं घेतल्या आहेत व त्या सर्वांस सर्व प्रकारचें सरकारी सहाय्य मिळत आहे व त्यांच्या पाठीशीं श्री. घारपुरे यांची बुद्धिमत्ता, दीर्घोद्योग, चिकाटी व संघटना-चातुर्य हीं होतीं व या सर्वांच्या बळावर आपल्या योजना त्यांनीं यशस्वी करून दाखविल्या. प्रदर्शनें व संग्रहालयें हे दोन्ही श्री. घारपुरे यांचे अत्यंत आवडते विषय. सात वर्षांपूर्वी त्यांनीं म. जमशेटजी टाटा यांचे स्मरणार्थ "पेटन्ट प्रदर्शन" भरविलें होतें. त्या समारंभाचे अध्यक्ष दिवाणबहादूर के. रामा पै, कंट्रोलर ऑफ पेटन्टस्, यांनीं श्री. घारपुरे यांच्या कल्पनेबद्दल व चातुर्याबद्दल मुक्त कंठानें स्तुति केली. श्री. घारपुरे म्हणजे प्रदर्शन व प्रदर्शन म्हणजे घारपुरे, असें समीकरणच पुण्यांतील त्यांचे कांहीं स्नेही व इतर मंडळी मांडत असत व तें अगदीं सत्य होतें. श्री. घारपुरे यांना त्यांच्या संग्रहालयाच्या संवर्धनाचा इतका ध्यास लागून राहिला होता कीं त्यांना याशिवाय दुसरा विषयच ठाऊक नव्हता. रात्रंदिवस त्यांना हा एकच विषय डोळ्यापुढें सतत दिसत असे व तें त्यांचें जीवितकार्य त्यांनीं करून ठेविलें होतें. एका मनुष्यानें एकाग्रतेनें एका संस्थेची सेवा केली म्हणजे ती संस्था नांवा-रूपास आलीच पाहिजे व त्यांनीं परिश्रमानें व दीर्घोद्योगानें पुणें येथील लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय हीं सर्व हिंदुस्थानांत सुपरिचित अशी संस्था केली आहे. केवळ स्वतःच्या संग्रहालयासाठींच ते परिश्रम करीत असत असें नव्हें, तर संग्रहालय-विषयक कांहींहि स्वरुपाची जरी चळवळ असली तरी त्यांस त्यांचा पाठिंबा असे. हिंदुस्थानांतील संग्रहालय-विषयक चळवळीचा इतिहास जेव्हां लिहिला जाईल त्या वेळीं श्री. घारपुरे यांचा या चळवळींतील भाग हा लेखकांस सुवर्णाक्षरांनीं लिहावा लागेल इतका तो महत्त्वाचा, बहुमोल, ठसठशीत आहे.

---

### भारतामधील कॉफीचें उत्पादन व खप

इंडियन कॉफी बोर्डाची ३५ वी वार्षिक सभा बंगलोर येथें गेल्या आठवड्यांत झाली. ह्या प्रसंगीं बोलतांना म्हैसूर राज्य सरकारचे उद्योगमंत्री श्री. सीदावीरप्पा म्हणाले कीं चालू सालीं भारतामधील कॉफीच्या धंद्यानें उत्पादन, खप आणि निर्यात ह्या तिन्ही दृष्टीनें उच्चांक गांठले आहेत. श्री. सीदावीरप्पा हे कॉफी बोर्डाचे अध्यक्षहि आहेत. भारतामधील कॉफीच्या धंद्याचा त्यांनीं आपल्या भाषणांत आढावा घेतला. ते म्हणाले कीं १९५३-५४ सालीं भारताचें कॉफीचें उत्पादन २९,४०० टनापर्यंत वाढलें. आतांपर्यंत एकाच वर्षी इतकें उत्पादन झाल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे. त्याचप्रमाणें, कॉफीच्या देशांतर्गत खपांतहि अशीच वाढ झालेली दिसून येते. चालू सालीं कॉफीचा खप २१,००० टनांच्या आसपास गेला. हा खपाचा आंकडा १९५२-५३ मधील खपाच्या आंकड्यापेक्षा २,५९३ टनांनीं अधिक आहे. निर्यातीकडे दृष्टि टाकतां चालू सालीं १०,६५० टन कॉफी निर्यात करण्यांत आली, अशी माहिती मिळते. १९४५-४६ सालीं कॉफीच्या निर्यातीनें त्यावेळेपर्यंतचा उच्चांक गांठला होता. पण त्या सालापेक्षा १९५३-५४ मधील कॉफीची निर्यात दुपटीपेक्षाहि अधिक झाली. इतर सालांच्या मानानें यंदा कॉफीच्या लिलावांतील किंमती बऱ्याच स्थिर राहिल्या. गेल्या वर्षी किंमतींत ६८ रुपयांपर्यंत चढघट झालेली दिसून येते. पण चालू सालीं हा चढउतार १५ रुपयांपर्यंतच झाला. इंडियन प्लँटेशन लेबर ॲक्टला अनुसरून कॉफीच्या मळ्यावरील मजुरांना अधिक सुखसोयी उपलब्ध करून द्याव्या लागत आहेत. तरी सुद्धा भारतांत कॉफीची किंमत वाजवीपेक्षा अधिक वाढूं देण्यांत आलेली नाहीं. भारताबाहेरील कॉफीच्या किंमतींत मात्र फार मोठे फरक होत असल्याचें दिसून येत आहे.

---

**सहकारी संस्थांची परिषद्**—गुजराथ, सौराष्ट्र आणि कच्छ ह्या भागांतील सहकारी संस्थांची एक परिषद् द्वारका येथें श्री. वैकुंठभाई मेहता ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरणार आहे. परिषद् ता. १८ व १९ डिसेंबर रोजीं भरविण्यांत येणार आहे. तींत नियंत्रित बाजारपेठा व इतर विषय ह्यांच्यावर चर्चा होणार आहे.

**दिल्ली राज्यांत गौळवाडा**—दिल्ली राज्यसरकारनें राज्यांत गौळवाडा काढण्याची योजना तयार केली असून, भारतीय सरकारच्या शेतकी-खात्याकडे आणि नियोजन-समितीकडे ती मंजुरीसाठीं धाडण्यांत आली आहे. ही योजना प्रत्यक्ष अमलांत यावयास दोन ते तीन महिन्यांचा अवधि लागेल आणि तीसाठीं १·२० कोटी रुपये खर्च येईल.

**नेपाळमधील रेल्वेची सुधारणा**—नेपाळ राज्यांत ६० मैल लांबीचा अरुंद रुळांचा रेल्वेचा रस्ता आहे. तो मार्ग रुंद रुळाचा करण्याचा सरकारचा विचार असून ह्या कामासाठीं भारतामधील तज्ज्ञांचा सल्ला घेण्यांत येत आहे. नेपाळ सरकारला सल्ला देण्यासाठीं भारताचे दोन रेल्वेविषयक अधिकारी नुकतेच नेपाळला गेले आहेत.

### टॅरिफ कमिशनच्या कार्याचा आढावा

टॅरिफ कमिशननें १९५३–५४ मध्यें संरक्षण देण्याची व तें चालू ठेवण्याबाबतचीं २२ व किंमती निश्चित करण्यासंबंधींचीं ६ अशा एकूण २८ प्रकरणांच्या चौकशीचें काम पुरें केलें. नव्या संरक्षणाची मागणी करण्यासंबंधांत सदर मंडळानें रंगद्रव्य, कॉस्टिक सोडा व ब्लिचिंग पावडर, टिटानियम डायऑक्साइड आणि ऑटोमोबाइल लीफ स्प्रिंग या धंद्यांची चौकशी केली, तर किंमती निश्चित करण्याबाबतच्या प्रकरणांत पोलाद, टिनप्लेट आणि सिमेंट या धंद्यांचा समावेश होतो.

संरक्षण व किंमती ठरविण्याबाबतच्या प्रकरणांच्या १९५३–५४ मधील चौकशीचे अहवाल कमिशननें सरकारकडे सादर केले असून, त्यापैकीं बहुसंख्य प्रकरणांत सरकारनें कमिशनच्या शिफारशींचा सर्वसाधारणपणें स्वीकार केला आहे. संरक्षण चालू ठेवण्यासंबंधांत चौकशी केलेल्या धंद्यांचे बाबतींत कमिशनला असें आढळून आलें कीं, संरक्षणामुळें सदर धंद्यांना प्रस्थापित होण्यास व उत्पादनवाढींत साहाय्य झालें असलें तरी, विशेषतः बाजाराचे, आतां ग्राहकांच्या बाजारांत झालेलें रूपांतर व अनेक दिशांनीं वाढणारी परदेशांची स्पर्धा लक्षांत घेऊन आपलें आसन आणखी स्थिरावण्याकरतां मालाच्या दर्जात सुधारणा व उत्पादन-खर्चात कपात करण्यासाठीं त्यांनीं आणखी प्रयत्न करावयास हवेत. अनेक संरक्षित धंद्यांत उत्पादनशक्तीचा पुरेसा वापर होत नसल्याचेंहि निदर्शनास आलें. कांहीं विशिष्ट देशांहून आपल्या देशांत कमी किंमतीच्या वस्तूंच्या होणाऱ्या आयातीबाबत वाटणारी भीति हेंच अधिक संरक्षण मागण्याचें एक कारण कांहीं प्रकरणांत पुढें करण्यांत आलें. कांहीं थोड्या प्रकरणांत तर देशांतील परकीय मालकीच्या कारखान्यांमुळें तीव्र स्पर्धेस तोंड द्यावें लागत असल्याचें मत भारतीय मालकीच्या कारखान्यांनीं मांडलें होतें.

निरनिराळ्या धंद्यांना द्यावयाच्या संरक्षणाचें प्रमाण ठरवितांना १९५१ च्या टॅरिफ कमिशन ॲक्टाच्या १४ व्या विभागांत नमूद केलेल्या तत्त्वांनुसार टॅरिफ कमिशननें शिफारशी केल्या.

टॅरिफ कमिशननें १९५२–५४ या मुदतींत साहाय्य अगर संरक्षण चालू ठेवण्याबाबतचीं ५०, किंमती ठरविण्याबाबतचीं ११ आणि स्टील कॉर्पोरेशन ऑफ बेंगॉल लि. आणि इंडियन आयर्न ॲण्ड स्टील कं. लि. यांच्या साध्या भागांचें (शेअर) परस्परांशीं रास्त प्रमाण ठरविण्याबाबत एक, अशा ६२ प्रकरणीं चौकशीचें काम पुरें केलें. संरक्षण देण्याबाबत नव्यानें मागणी केल्यानें चौकशी कराव्या लागलेल्या धंद्यांत मोटर धंदा व त्याचे अनुषंगिक धंदे, डिझेल फ्युएल इंजेक्शन इक्विपमेंट, बॉल बेअरिंग ॲंड स्टील बॉल्स, इत्यादि धंद्यांचा अंतर्भाव होतो.

---

**फ्रान्सचा मोटारींचा धंदा**—फ्रान्समधील मोटारींच्या कारखान्यांचें उत्पादन हळुहळू वाढत चाललें आहे. चालू वर्षाच्या पहिल्या सात महिन्यांत कारखान्यांनीं ४,५६,६३४ मोटारी तयार केल्या. गेल्या वर्षी ह्याच काळांत ३,९८,३९५ मोटारी तयार झाल्या होत्या. फ्रान्समधून निर्गत होणाऱ्या मोटारींच्या संख्येंतहि वाढ होत चालली आहे.

**मध्य-प्रदेश सरकारला कर्जे**—शहरांतील सांडपाण्याचा शेतीसाठीं उपयोग करून घेण्याची एक योजना मध्यप्रदेश सरकारनें आंखली होती. ही योजना अमलांत आणण्यासाठीं भारतीय सरकारच्या अन्न व शेती खात्यातर्फे राज्यसरकारला ५ लाख रुपयांचें कर्ज मंजूर करण्यांत आलें आहे.


स्था. सुरक्षा आणि सौजन्याचें प्रतीक
स्थापना १९१८
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक
लिमिटेड.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई
अधिकृत भांडवल रू. १०,००,०००
वसूल झालेलें भांडवल रू. ७,२७,३००
रिझर्व रू. ६,०६,०००
ठेवी रू. १,२२,०८,०००
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.
★ शाखा:- दादर, माहीम, बेळगांव, पुणें. ★


---

### भारत सरकारचें साखरविषयक धोरण

१९५५–५६ च्या हंगामांत निर्वात काहिली वापरणाऱ्या कारखानदारांकडून खरेदी केल्या जाणाऱ्या उंसाचे बाबतींत कारखान्यापाशीं माल घेतल्यास दर मणीं १ रु. ७ आ. व रेल्वे स्टेशनांवर घेतल्यास दर मणीं १ रु. ५ आ. अशी किमान किंमत भारत सरकारनें निश्चित केली असल्याचें मध्यवर्ती अन्न व शेतकी खात्यानें २६ नोव्हेंबर १९५४ रोजीं प्रसिद्ध केलेल्या एका पत्रकांत म्हटलें आहे.

मागील दोन वर्षांप्रमाणेंच १९५४–५५ च्या हंगामांतही साखर, गूळ व खांडसारी यांचें वांटप व किंमत यांवर कोठल्याहि तऱ्हेचें कायदेशीर नियंत्रण न ठेवण्याचें सरकारनें ठरविलें आहे. तथापि, कारखान्यांत तयार झालेल्या एकूण साखरेपैकीं २५ टक्के साखर कारखान्यांत राखून ठेवण्यांत येईल आणि आवश्यकता पडल्यास नियंत्रित वांटपासाठीं कारखान्याचे ठिकाणीं मिळणाऱ्या वाजवी दरांनीं सरकार ती आपल्या ताब्यांत घेईल. कारखान्यांतून साखर मोकळी करण्यावरहि पूर्वीप्रमाणें सरकारचें नियमन राहील.

१९५४–५५ च्या हंगामांतील साखरेचें देशी उत्पादन व खप ह्यांतील फरक भरून काढण्यासाठीं सरकारनें मोठ्या प्रमाणावर शुभ्र साखरेची आयात करण्याचें ठरविलें आहे. त्याशिवाय, साखर-कारखान्यास मोकळ्या वेळांत साखर शुद्ध करण्यासाठीं कच्च्या साखरेची आयात करूं देण्यांत येईल.

---

### हिंदी बनावटीच्या टायर्सची निर्गत

भारतांत तयार झालेल्या रबरी टायर्स प्रथमच निर्गत करण्यांत आल्या. ता. २ रोजीं, ३० अर्थमुद्रर टायर्स बोटीवर चढविण्यांत आल्या. सिंगापूरकडे त्या रवाना झाल्या. भारत सरकारच्या सहकार्यानें फायरस्टोन कंपनी ह्या टायर्स करीत आहे. रस्ते, पूल, धरणें, हैड्रो-इलेक्ट्रिक योजना, इत्यादींसाठीं वापरण्यांत येणाऱ्या वहानांना हे टायर्स लागतात.

---

### फ्रान्समध्यें बँकरेट उतरला

कर्जावरील व्याजाचे दर उतरावे, ह्यासाठीं दि बँक ऑफ फ्रान्सनें आपला डिस्कौंट रेट २ डिसेंबरपासून ३.२५% वरून ३% वर उतरविला.

## अमेरिकेंतील मोटर धंदा

### प्रचंड प्रमाणावर केंद्रीकरण

अमेरिकेंत नवीन नमुन्याच्या मोटारगाड्या तयार करण्याचा उपक्रम सध्यां जोरांत सुरू आहे. अमेरिकन मोटरींच्या नमुन्यांच्या घाटणींत मोटार धंद्याच्या अर्धशतकाच्या इतिहासांत अपूर्व ठरणारें नाविन्य आतां दिसून येईल, असें माहीतगार निरीक्षकांचें मत आहे.

१९५४ चे पहिले सहा महिने व त्या पूर्वीचे सहा महिने या बारा महिन्यांच्या काळांत मोटरींच्या मागणीवर किंवा पुरवठ्यावर युद्धाचा किंवा युद्धाच्या धास्तीचा परिणाम झाला नाहीं. युद्ध-काळांत मोटरींना जी विपुल मागणी आली ती पुरविण्यासाठीं युद्धानंतर लगेच उत्पादन प्रचंड प्रमाणांत वाढविलें गेलें. १९४१ सालीं ४८,४०,५०२ मोटरगाड्यांचें उत्पादन झालें होतें, तर १९५० सालीं ८०,०३,०५६ मोटरगाड्या तयार झाल्या. मोटर-धंद्याच्या इतिहासांत उत्पादन इतकें कधींच वाढलें नव्हतें.

१९५० च्या अखेरच्या कांहीं महिन्यांत बिनलष्करी उपयोगा-साठीं होणारें मोटर-गाड्यांचें उत्पादन घटलें. दक्षिण कोरियावर कम्युनिस्टांनीं स्वारी केल्यामुळें नागरी उत्पादन कमी करून संरक्षणाच्या दृष्टीनें लष्करी उत्पादनांत वाढ केली गेली.

१९५१ सालचें मोटारगाड्यांचें एकंदर उत्पादन ६७,६५,२६३ होतें. १९४१च्या उत्पादनापेक्षा हा आंकडा सुमारें २०,००,००० नीं अधिक होता. १९५२ सालीं उत्पादन घटून ५५,३८,९५९ झालें. पण संरक्षणासाठीं उत्पादन करण्याचा प्रश्न १९५३ सालीं पूर्वीसारखा बिकट राहिला नव्हता, आणि म्हणून त्या वर्षी ७३,२३,२१४ मोटरगाड्या तयार झाल्या. मोटर धंद्यांचें तें दुसऱ्या क्रमांकाचें भरभराटीचें वर्ष होतें.

१९५४ च्या पहिल्या सहा महिन्यांत उत्पादन ३५,३७,४५२ पर्यंत पोंचलें. यांत प्रवासी गाड्या २९,७१,५५१, मालाच्या गाड्या ५,६१,८७६ व बस गाड्या २,०२५ होत्या. माहितगार गोटांत असा अंदाज आहे कीं, या सबंध वर्षातील एकूण विक्रीचा आंकडा ५२,५०,००० पर्यंत जाईल. तसें झालें. तर १९५४ हें मोटरधंद्याचें तिसरें उत्कृष्ट साल ठरेल.

१९५५ सालीं मोटारींच्या उत्पादनांत किंवा विक्रींत घट होण्याचा संभव नाहीं. पहिल्या सहामाहींत ६० टक्के उत्पादन व किरकोळ विक्री होऊन जाईल. आणि एप्रिल ते जून या काळांत कामाचा भार विशेष असेल. विक्री-तज्ज्ञांच्या मतें १९५५ ची किरकोळीची मागणी चालू वर्षाच्या किरकोळीच्या मागणीइतकी सहज होईल.

अमेरिकन मोटर-गाड्यांची निर्यात विक्री वाढत आहे. १९५४ च्या पहिल्या पांच महिन्यांत "कार" गाड्या, मालाच्या गाड्या व बस गाड्या यांची निर्यात १,७८,०६६ नगांपर्यंत पोंचली होती. १९५३ च्या पहिल्या पांच महिन्यांतील निर्याती-पेक्षा ही निर्यात २४,६६३ नगांनीं किंवा १६·१ टक्क्यांनीं अधिक होती. १९५४ सालीं पहिल्या पांच महिन्यांतील उत्पादनाचा ४·४ टक्के भाग निर्यात झाला, तर १९५४ सालीं त्याच काळांतील उत्पादनाचा ६·१ टक्के भाग निर्यात झाला. १९५४ सालची टक्केवारी अखेरपर्यंत वाढेल.

मोटरगाड्यांच्या उत्पादनांत अमेरिका हें सगळ्या जगांत अग्रेसर आहे. (१९४९ सालीं जगांतील ७६ टक्के मोटरगाड्या अमेरिकन कारखान्यांत तयार झाल्या होत्या), तरी सुद्धां तुलनेनें पहातां अमेरिकेंत मोटारींच्या कारखान्यांची संख्या अगदी थोडी आहे. या धंद्यांत सुरवातीपासून प्रचंड प्रमाणावर केंद्री-करण होत आलें आहे.

"फोर्ड मोटर कंपनी", "जनरल मोटर्स कॉर्पोरेशन" व "क्रायस्लर कॉर्पोरेशन" या मोटर धंद्यांतील "बड्या तीन" संघटना मिशिगन राज्यांत डेट्रॉइट येथेंच आहेत. अमेरिकन मोटरगाड्यांच्या (कार) १९ नमुन्यांपैकीं १२ नमुने या तीन कंपन्यांत तयार होतात. "फोर्ड" कंपनी "फोर्ड", "मर्क्युरी" व "लिंकन" हे नमुने तयार करते. "जनरल मोटर्स" कंपनी "शेवरोलेट", "ब्यूक", "पाँटिॲक", "ओल्डस्मोबील" व "कॅडिलॅक" हे नमुने तयार करते आणि "क्रायस्लर", "डॉज", "प्लिमथ" व "डीसोटो" हे सर्व नमुने "क्रायस्लर" कंपनींत तयार होतात.

विस्तारामुळें व सामुदायिक उत्पादनामुळें मोटारी तयार करण्याचा धंदा प्रचंड वाटतो, पण त्याच्याशीं संबद्ध असलेल्या धंद्यांशीं त्याची तुलना केली म्हणजे त्या धंद्याचें क्षेत्र लहान भासूं लागतें. मोटरगाड्या, त्यांचे भाग व टायर तयार करण्याच्या धंद्यांत सुमारें ९,००,००० लोक गुंतलेले असतात. पण मोटरी विकणें, साफ करणें वगैरे धंद्यांत याच्या दसपट लोक काम करीत आहेत. पेट्रोलचीं केंद्रें, मोटर दुरुस्तीचे कारखाने, मालाच्या मोटरी पुरविणाऱ्या कंपन्या, टॅक्सी भाड्यानें देणाऱ्या कंपन्या, मोटरींचे सुटे भाग व मोटरींच्या उपयोगाचा माल विकणाऱ्या कंपन्या अशा या जोड धंद्यांत छोट्या धंदेवाल्यांचेच सर्व व्यवहार असतात. मोटर धंद्यांशीं संबद्ध असलेले इतर धंदे म्हणजे मोटरींनें जाणाऱ्या प्रवाशांसाठीं हमरस्त्यांच्या बाजूला असणारीं विश्रामस्थानें (मोटेल), भाडें घेऊन मोटरी उभ्या करण्याचे तबेले (पार्किंग लॉट), मोटरवाहतुकीसाठीं मोटरींचे विमे उतरविणाऱ्या कंपन्या, हे होत.

खुद्द मोटरी तयार करण्याच्या धंद्यांतच हजारों छोट्या कंपन्यांची मदत घ्यावी लागते. मोटरी तयार करणारी एक कंपनी साधारण-पणें १२,००० छोट्या कंपन्यांचा माल वापरते.

---

## विणकरी लोकांच्या सहकारी संस्थांना मदत

### शेअर भांडवलासाठीं बिनव्याजी कर्ज

जास्तींत जास्त विणकरी लोक सहकारी चळवळींत सामिल व्हावे म्हणून प्रत्येक विणकरास शेअर भांडवल घेण्यासाठीं जें १० रुपयांचें कर्ज देण्यांत येतें, तें बिनव्याजी असावें असें मुंबई सरकारनें ठरविलें आहे.

सदरहू कर्ज दरमहा एक रुपया याप्रमाणें दहा महिन्यांत वसूल करण्यांत येईल. कर्जाची रकम विणकऱ्यानें आपल्या सहकारी संस्थेस द्यावयाची असते. त्यानें ती तशी दिली नाहीं तर सहकारी संस्था विणकऱ्यास कापड उत्पादनासाठीं देण्यांत येणाऱ्या रोजंदारींतून वसूल करून घेईल.

---

### पोटावरून हरिद्वारचा प्रवास

पोटावर ढकलत ढकलत एक मनुष्य दिल्लीहून हरिद्वारला जाण्यास निघाला आहे. दिल्ली तें हरिद्वार हें अंतर १५० मैल आहे. ज्या गतीनें तो जाऊं शकतो ती लक्षांत घेतली व तो शेवटपर्यंत जगला, तर त्याला हरिद्वारला पोंचण्यास कित्येक वर्षे लागतील!

## सातारा जिल्हा को-ऑप. लँड मॉर्गेज बँकेस सहकारी मंत्र्यांची भेट

### बँकेचे चेअरमन, श्री. कल्याणी, यांचें भाषण

[ शुक्रवार ता. ३।१२।५४ रोजीं मुंबई राज्याचे सहकारमंत्री व पुरवठा आणि स्थानिक-स्वराज्यमंत्री नामदार श्री. एम्. पी. पाटील व ना. यशवंतराव चव्हाण यांनीं या बँकेस भेट दिली व बऱ्याचशा महत्त्वाच्या विषयांवर चर्चा केली. उभयतां नामदार यांनीं लांब मुदतीचें कर्ज शेतकरी बांधवांस अत्यंत हितावह आहे व मद्रासप्रमाणें या चळवळीची पायाशुद्ध उभारणी लवकरच होईल असें आश्वासन दिलें. त्यावेळीं नामदार मंत्र्यांचें स्वागत करून बँकेचे चेअरमन श्री. नीळकंठराव कल्याणी यांनीं केलेल्या भाषणाचा सारांश येथें दिला आहे. ]

वेळोवेळीं येणाऱ्या आपत्तींतून अडखळत, ठेंचकळत आणि शेतकरी बांधवांच्यामध्यें संस्थेची स्वतःची पत सांभाळत १९४७ पर्यंत लँड मॉर्गेज बँकांचें कामकाज चाललेलें होतें. १९४८-४९ पासून लांब मुदतीच्या कर्जाच्या चळवळीस कोठें जोर येतो न येतो तों १९५२ अखेर भांडवलाअभावीं म्हणून सर्वच व्यवहार स्थगित झाले. कार्यकर्त्यांमध्यें निरुत्साह निर्माण होणें साहजीक होतें परंतु सरकारनीं वेळींच लक्ष घातल्यामुळें लांब मुदतीच्या कार्यास सहकारी चळवळीमध्यें नुकतेच प्रमुख व महत्त्वाचें स्थान मिळालेलें आहे. आतां मात्र या चळवळीबद्दल एकप्रकारचा उत्साह कार्यकर्त्यांना वाटणेस हरकत नाहीं. लँड मॉर्गेज बँकांच्या पुनर्व्यवस्थेकरितां काय करावयास पाहिजे हें जाणावें म्हणून खुद्द रिझर्व्ह बँकेकडून निरनिराळ्या जिल्हाबँकांची व वरिष्ठ बँकांची तपासणी घेऊन त्यांच्या अडीअडचणी समजून घेण्यांत आल्या इतकेंच नव्हें तर त्यांच्या सूचनेप्रमाणें जरूर त्या सुधारणेचें काम चालू आहे. त्याबद्दल ही बँक अत्यंत ऋणी आहे.

शेती-व्यवसाय व शेती-सुधारणा करण्यास लँड मॉर्गेज बँकांचा जास्त प्रमाणांत शेतकरीबंधूंनीं उपयोग करून घ्यावा व त्यांना सवलतीच्या व्याजाचा फायदा मिळावा म्हणून पूर्वीप्रमाणेंच सरकारनें मदत देण्याचा नुकतांच निर्णय घेतला आहे याबद्दल या संस्थेस अत्यंत आनंद होत आहे.

जगांतील सर्वच सुधारलेल्या राष्ट्रांत शेतकऱ्यांच्या लांब मुदतीच्या कर्जाची व्यवस्था ज्या त्या सरकारकडून स्वतःच केली जाते. जें सरकार स्वतः या खात्याकडे पाहात नाहीं तें हें काम ज्या ज्या संस्थेकडे सोपविलेलें असतें त्यांच्यांत प्रामुख्यानें भाग घेऊन संस्थेचे व्यवहार सुसंघटित चालण्यास सरकारकडून प्रयत्न केले जातात, मदत केली जाते, सल्ला इत्यादि साहाय्य केलें जातें. लांब मुदतीच्या कर्जाचे व्यवहार वाढवून शेतीच्या उद्योगाची उर्जितावस्था होण्यास सरकारची मदत असल्याशिवाय हें साधणें शक्य दिसत नाहीं. मला येथें नमूद करणेस आनंद वाटतो, कीं आपल्या राज्यांत लॅण्ड मॉर्गेज बँकांच्या चळवळीस सुरुवातीस प्रोत्साहन देऊन जरूर तें सर्व साहाय्य करण्यास आलें. मधल्या दहा वर्षांचे काळांत या ना त्या कारणामुळें कांहींसें दुर्लक्ष होऊन या चळवळीची वाढ थोडीबहुत खुंटली असें म्हणण्यास हरकत नाहीं. सुदैवानें सरकारकडून आतां जरूर त्या व्यवस्था सर्वच बाबतींत होत असल्यानें या चळवळीचें भविष्य इतर सहकारी संस्थांप्रमाणें उज्ज्वल होईल यांत शंका नाहीं.

प्राथमिक लॅण्ड मॉर्गेज बँकांचे व्यवहार झपाट्यानें वाढल्याशिवाय त्यांना स्वतःच्या पायावर कधींच उभे राहतां येणार नाहीं. कारण, त्यांना उत्पन्नाचीं अन्य साधनें नसतात, इतकेंच नव्हें पण मिळणारें उत्पन्नहि अगदींच तोकडें असतें. तेव्हां आहे त्या कर्जाचे धोरणांत कांहींअंशीं शिथीलता आणणेचा विचार केल्यास संस्थांचे व्यवहार वाढणेस मदत होणार आहे. उदा० आज महाराष्ट्रांत बरेचसे साखरेचे कारखाने निघत आहेत. आमचे जिल्ह्यांतच तीन नवीन सहकारी साखरकारखाने सुरू होत आहेत. या कारखान्यांचा सर्वच शेतकऱ्यांना फायदा मिळावा अशी सरकारची इच्छा असणारच. परंतु लहानसहान शेतकऱ्यांना या कारखान्याचा सभासद होतां येईल काय याचा विचार होणें अत्यंत जरूरीचें व अगत्याचें आहे. बँकेचे मूळ पोटनियमांत शेतकऱ्यांचें आर्थिक जीवनमान सुधारणेस, कर्ज देणें हा मुख्य उद्देश आहे. मोठ्या रकमा ज्या त्या सभासदांच्या परिस्थितींस अनुसरून एकदम फेडतां येत नाहींत म्हणून कर्ज काढून कोणी शेअर्स घेण्यास तयार होत नाहींत. शेअर्स घेतल्याशिवाय दोनतीन एकरांच्या मालकाला यांत भाग घेतां येत नाहीं. अगर कारखान्याचा त्याला कांहीं उपयोग नाहीं अशा परिस्थितींत शेतीच्या उत्पन्नाची वाढ व्हावी, सुधारलेल्या साधनांचा उपयोग व्हावा, जवळपास तयार माल मिळावा याकरितां शेतकऱ्यास जरूर तर शेअर्स घेण्यास देखील या बँकांना कर्ज देण्यास परवानगी देण्याचा सरकारनीं सहानुभूतीपूर्वक विचार करावा. सहकारी सोसायटींना असें कर्ज देतां आल्यास तें धोक्याचें आहे असें मला प्रामाणिकपणें म्हणावें लागेल. लागवड, बीबीयाणें इत्यादिकरितां लागणारें दरसालचें कर्ज आणि शिवाय साखरकारखान्याचे शेअर्सकरितां लागणारें कर्ज घेऊन त्याला एक वर्षाचे आंत अगर पांच वर्षांत तरी ऋणमुक्त होतां येईल किंवा कसें याची शंकाच आहे. आमच्या वीस वर्षांचे अनुभवावरून कित्येक वर्षांपूर्वीं काढलेलें शेदोनशें रुपयांचें कर्ज देखील आजच्या तारखेस कायम आहे असें दिसून आलेलें आहे. शेतकरी बांधवांना पूर्णपणें ऋणमुक्त करावयाचे झाल्यास अगर सर्वसाधारणपणें पुन्हां तो कर्जांत पडूं नये म्हणून अल्प मुदतीचें अगर मध्यंतरीचें कर्जापेक्षा लांब मुदतीचें कर्जच परिणामीं हितावह आहे असें मोठमोठ्या तज्ज्ञांचेंहि मत आहे. तेव्हां या गोष्टीचा विचार व्हावा, त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील प्रत्येक कुटुंबास रहाणेस निदान व्यवस्थित घर तरी असणें जरूरीचें आहे आणि तें सरकारांसहि पटलेलें आहे. आमचा व्यवहार अर्थात्‌च शेतकरी बांधवांशीं असल्यानें त्यांना रहाणेकरितां घर बांधण्याचें झाल्यास या बँकेस त्यांना आर्थिक मदत देतां येत नाहीं. तसेंच एकाद्या शेतकऱ्यास आपल्या मुलास उच्च शिक्षण द्यावयाचें म्हटल्यास तेंहि आमच्या चाकोरींत बसत नाहीं. लग्नकार्य, यात्रा वगैरे अनाठायीं होणारे खर्चास लांब मुदतीचें कर्ज मुळींच दिलें जाऊं नये परंतु ज्यामुळें सभासदांची गरज भागून त्यांचें जीवनमान सुधारणेस मदत होणार आहे अशा प्रकारच्या सर्वच गरजा लँड मॉर्गेज बँकेकडून पुऱ्या करण्यास प्रत्यवाय असूं नये असें मला वाटतें.

तगयी कर्जाचे व्यवहारहि बहुतेक या बँकांचे व्यवहारासारखेच आहेत. तेव्हां हा व्यवहार या बँकांकडे सोंपविण्यास कांहीं हरकत आहे असें मला दिसत नाहीं. अर्थात् याकरितां जरूर तो नोकरवर्ग कांहीं वाढवावा लागेल पण त्यामुळें सरकारवरील बोजा बऱ्याचशा प्रमाणांत कमीहि होईल. प्रात्यक्षिक म्हणून रुपये तीन हजार वरील कर्ज लँड मॉर्गेज बँकेकडूनच घेतलें जावें असा सरकारनें निर्णय घेणेचा विचार करावा अशी विनंती आहे.

रिझर्व्ह बँकेच्या सूचनेस अनुसरून लँड मॉर्गेज बँकांकरितां सहकारी खात्यांत एक स्वतंत्र अधिकारी व जरूर तो नोकरवर्ग

देणेबद्दल तातडीनें सरकारकडून विचार व्हावा. १९४२ पर्यंत लँड मॉर्गेज बँकांकरितां एक स्वतंत्र अधिकारी व जरूर तो नोकरवर्ग असल्यानें योग्य तें मार्गदर्शन, सल्ला, तपासणी, वसूली, वरिष्ठ बँकेशीं जिल्हा बँकांचे वेळोवेळीं उपस्थित होणारे जिव्हाळ्याचे प्रश्न, लँड व्हॅल्यूएशन ऑफिसरवरील देखरेख इत्यादि अनेक कामें व्यवस्थितपणें चालत होती, तीच सुसंघटित व्यवस्था पुन्हा चालू व्हावी म्हणून कार्यकर्त्यांची फार दिवसांची मागणी आहे. सालोसाल व्यवहार वाढत आहेत. वाढत्या व्यवहाराबरोबर थकबाकीहि वाढत आहे. अत्यंत महत्त्वाचे प्रश्न निर्माण होत आहेत. अशा प्रसंगीं आमच्या मागणीप्रमाणें जरूरतो नोकरवर्ग मिळाल्यास बऱ्याच कामांचा उरक होण्यास मदत तर होणार आहेच पण त्याचबरोबर चळवळ वाढण्यास अवसर मिळणार आहे.

हल्लींचे व्याजाचे दर विशेषतः जुनें कर्ज भागविणेस व जमीन खरेदीकरितां दिले जाणाऱ्या कर्जावर दर जास्त आहे. त्याचप्रमाणें कर्जफेडीकरितां जास्तींत जास्त मिळणारी मुदतहि कमी आहे. व्याजाचे दर व कर्जफेडीची पंधरा वर्षांची मुदत शेतकऱ्यांना न परवडण्यासारखी आहे. लांब मुदतीच्या कर्जाचे हप्ते निदान पक्षी २० तरी असणें अत्यंत जरूरीचे आहे. व्याजाचे दरहि सहा टक्क्यापेक्षा जास्त असूं नयेत. अल्पमुदतीचें कर्ज देतांना रिझर्व्ह बँकेकडून दीड टक्का व्याजाचा दर आकारला जातो. त्याचप्रमाणें मध्यम मुदतीचे कर्जासहि तोच दर आहे. याचा विचार केल्यास लांबमुदतीचे कर्जासहि या सवलती कां मिळूं नयेत याचा उलगडा होत नाहीं. तेव्हां या बाबतींतहि सरकारकडून विचार व्हावा. सरकारकडून डिबेंचर्सच्या मुद्दलाची व व्याजाची वेळोवेळीं हमी घेतली गेल्यामुळेंच या बँकांना भांडवल उपलब्ध होऊं शकलेलें आहे. गेल्या वीस वर्षांच्या अनुभवांतीं मजला येथें जाहीर करण्यास आनंद वाटतो कीं, एकाहि शेतकऱ्याकडून त्यास दिलेलें कर्ज संशयित अगर बुडीत झालेलें आमचे निदर्शनास आलेलें नाहीं. तेव्हां भांडवलाची तरतूद सरकारकडून होण्यास कांहीं हरकत नाहीं असें वाटतें.

बँकेच्या पोटनियमांत जरूर ती दुरुस्ती करून व रजिस्ट्रार यांचे संमतीनें स्वतःचा लॅन्ड व्हॅल्युएशन ऑफिसर नेमिलेला आहे. रजिस्ट्रारसाहेब यांचे सल्ल्यानुसार जरूर तें ट्रेनिंगहि खात्याकडून देण्यांत आलेलें आहे. लॅण्डव्हॅल्यूएशन ऑफिसरांची जबाबदारी फार मोठी व महत्त्वाची आहे याचा बँकेनें पूर्ण विचार करूनच ही जबाबदारी स्वतःवर घेतलेली आहे. या नेमणुकीमुळें बँकेचे सरकारी लॅण्डव्हॅल्यूएशन ऑफिसचे बाबतींत होणारे खर्चांत व कामकाजाच्या पद्धतींत सुधारणा होणेस एकप्रकारें मदतच होईल असा आमचा विश्वास आहे. सरकारी लॅण्डव्हॅल्यूएशन ऑफिसर बँकेकडून घेण्यांत आलेस त्यांचा पगार, डेप्युटेशन अलावन्स, पेन्शन वर्गणी, रजा वर्गणी मिळून ५२०० रुपये खर्च येत असून, बँकेचा माणूस बँकेनें स्वतःमार्फत नेमून घेतल्यास त्याचेसाठी रुपये ४००० च खर्च येईल. त्यापैकीं सुमारें २००० रु. फीच्या पोटीं मिळणारी रक्कम वजा केल्यास दरसाल निदान बाराशें रुपये जास्त खर्च बँकेला सोसावा लागतो. शिवाय नोकर खात्यातील असलेमुळे बँकेस तो जबाबदार कितपत राहूं शकेल किंवा नाहीं याची खात्री नसते. अशा परिस्थितींत कदाचित् खात्याकडून लॅण्डव्हॅल्यूएशन ऑफिसर नेमला गेल्यास पेन्शन, रजा, वर्गणीचे बाबतींत पूर्वीप्रमाणें सवलत देण्यांत यावी व खर्चाचे तोंड मिळविणेकरितां आणखी पांच वर्षें दरसाल एकहजार रुपयाप्रमाणें मदत देण्यांत यावी अशी विनंती आहे.


## महाराष्ट्र ब्राह्मण सहायक पेढी, मर्यादित, इंदूर

### रौप्यमहोत्सव समारंभ

महाराष्ट्र ब्राह्मण सहायक पेढी, मर्यादित, चा रौप्यमहोत्सव दि. १९ रोजीं साजरा होणार आहे. पेढीच्या एकूण ३ लक्ष, ६० हजार रुपयांच्या खेळत्या भांडवलापैकीं १ लक्ष, १४ हजार रुपयांचें भांडवल स्वतःच्या मालकीचें झालेलें आहे, ह्यावरून तिच्या सुस्थितीची कल्पना येईल. पेढीच्या इमारतखर्चाचे पोटीं जिंदगी ३४,३७० रुपयांची आहे आणि तिनें २,०५,६०७ रुपयांचीं कर्जें दिलेलीं आहेत. पेढीनें गेलीं २५ वर्षें उत्कृष्ट रीतीनें कारभार करून मध्यमवर्गीयांची चांगली सेवा चालविली आहे. आम्हीं संस्थेस आणखी उज्ज्वल भवितव्य चिंतितों.

( अध्यक्ष : मा. गो नातू , अ. चिटणीस : वि. त्रिं. कोतवाल )

श्रीलक्ष्मी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. फलटण

## प्रकट सूचना

बँकेची २८ वी वार्षिक साधारण सभा दि. २६-१२-१९५४ रोजीं सायंकाळीं ५-३० वा. फलटण येथें बँकेच्या इमारतींत भरणार आहे. त्या सभेंत—

( १ ) मागील साधारण सभांचे वृत्तांत ( २ ) ऑडिटर यांची तपासणीयादी ( ३ ) ३०-६-१९५४ ला संपलेल्या वर्षाचें प्रतिवृत्त, ताळेबंदपत्रकें, नफावांटणी, ( ४ ) भागीदारांना वाटावयाचा नफा ( ५ ) पुढील वर्षासाठीं ऑडिटर यांची नेमणूक व त्यांचें वेतन ( ६ ) रु. ४९६-१५-० ची कर्जाची सूट ( ७ ) निवडून आलेल्या संचालकांचीं नांवें प्रकट करणें. ( ८ ) इतर व आयत्या वेळचीं कामें, यांचा विचार होणार आहे.

सर्व भागीदारांनीं सभेस अगत्य यावें अशी विनंति आहे.

फलटण
दि. ९-१२-५४

संचालकमंडळाच्या आज्ञेवरून
श्री. ह तळवलकर,
व्यवस्थापक

स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—*पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी व लोणंद

ता. ३१-१२-५३ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | १,९९,००० |
| ठेवी | रु. | ७२,६८००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८६,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.